# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना कमांक 513 दिनांक 1 ऑगष्ट 1923
द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## (गोपनिय विभाग)


परीक्षा भवन, एल. आय. टी. परिसर, अमरावती रोड, नागपूर – 440033
दुरध्वनी क्र. 0712–2523298, 6566875 फॅक्स क्र. 0712–2546263


क्र. गोप./ 133-17 दिनांक :– 15 /02/2018

प्रति,

**प्राचार्य /संचालक/ विभागप्रमुख,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये आणी विद्यापीठाचे
संचालीत महाविद्यालये /पदव्युत्तर विभाग

**विषय** :–उन्हाळी 2018 च्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच सेशनल गुणांबाबत.

**महोदय /महोदया ,**

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी – 2018 च्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आपल्या महाविद्यालयात आयोजित करावयाच्या आहेत.

1. पदवी/पदवीका परीक्षा अ) प्रथम व व्दितीय वर्ष दिनांक 20/02/2018 ते 16/03/2018
   ब) तृतीय व ईतर दिनांक 25/02/2018 ते 14/03/2018
2. पदवी, पदव्युत्तर सत्रपध्दती परीक्षा
   अ) सर्व परीक्षा दिनांक 15/03/2018 ते 31/03/2018

आपल्या महाविद्यालयात वर नमुद वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा उपरोक्त कालावधीत कोणत्या तारखेस आयोजित करावयाची तारीख तसेच अंतर्गत परीक्षकांची नावे दिनांक 20–02–2018 पर्यंत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत कळवुन त्यांची पोच घ्यावी.

तसेच सर्व परीक्षेचे सेशनल गुण पत्रके हे लेखी परिक्षा सुरु होण्याच्या 03 दिवस आधी ऑनलाईन **college.rtmnuresults.org** या संकेत स्थळावर विद्यार्थ्यांचे कमांकासहित पाठवुन किंवा विद्यार्थ्यांचे परिक्षा कमांक (**RollNo.**) प्राप्त होताच 3 दिवसांचे आत त्याची हार्ड कॉपी गोपनीय विभागास सादर करुन त्याची पोच घ्यावी. ठराविक वेळेनंतर आलेले सेशनल गुण परिपत्रक कमांक 1252 दिनांक 08–11–2016 नुसार प्रती दिन रु 1,000/– प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच ज्या महाविद्यालयात एकही विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नाही, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण महाविद्यालयाच्या (संस्थेच्या) अध्यक्ष किंवा सचिव यांना प्रदान करता येणार नाही. ज्या महाविद्यालयामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नसलेल्या महाविद्यालयांनी अध्यक्ष किंवा सचिवांच्या स्वाक्षरीने अंतर्गत गुण विद्यापीठाकडे सादर करु नयेत.

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयात संबंधित वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यावर, परीक्षा कमांकासहित त्यांचे गुणपत्रक ऑनलाईन **college.rtmnuresults.org** या संकेत स्थळावर पाठवुन त्याची हार्ड कॉपी अंतर्गत व बाहय परीक्षकांच्या स्वाक्षरीनिशी मोहरबंद लिफाफ्यात पुढील 24 तासाच्या आत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत त्यावर परिक्षेचे नाव, वर्ष, वर्ग, प्रात्यक्षिक परीक्षेचा विषय इत्यादी नमुद करुन सादर करावे, अन्यथा प्रात्यक्षिक परिक्षांच्या गुणांचे मोहरबंद लिफाफे स्वीकारल्या जाणर नाही.

जर प्रात्यक्षिक परीक्षा ही सुरु झाल्यानंतरही विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांचे परीक्षा कमांक प्राप्त झाले नसेल, अश्या वेळेस प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळी विद्यार्थ्यांचे नाव व त्यांची स्वाक्षरी घेवून प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण अंतर्गत व बाहयपरीक्षकांच्या स्वाक्षरीनीशी प्राचार्य हयांचेकडे सिलबंद लिफाफ्यात जमा करावी, विद्यापीठातर्फे परीक्षा कमांक प्राप्त होताच प्राचार्य नमूद संकेतस्थळावर गुणपत्रक ऑनलाईन पाठवून त्याची हार्ड कॉपी गोपनीय विभागात विशेष दूतामार्फत सादर करतील.तसेच उपरोक्त माहीतीनुसार कळवून सुध्दा बरेच महाविद्यालयातून चूकीचे गुणाबाबत पत्रव्यवहार करण्यात येतो, झालेली चुक हि महाविद्यालय स्तरावर झाल्याने गुणात दुरुस्ती

करता येणार नाही, याची नोंद घ्यावी व गुणाबाबत संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/विभाग प्रमुख /संचालक जबाबदार राहतील.

कृपया वरील बाबींची नोंद घेवून योग्य कार्यवाही करावी.

आपला

(डॉ.निरज खटी)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ,नागपूर